दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

**MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: म.न.पा/वैद्यकीय/१२६६/20-21. दिनांक : 31-07-2020

**: हॉटस्पॉट क्षेत्रामधील लॉकडाऊन आदेश :**

**विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत लॉकडाऊन सुरू ठेवणेबाबत.**

संदर्भ :-
१. साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७
२. आपत्ती व्यवस्थापन कायदा,२००५
३. शासन अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१३ मार्च २०२०
४. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-2020/C.R.92/DMU-I दि.२९ जून २०२० चे आदेश
५. मिरा भाईंदर महानगरपालिका जा.क्र.मनपा/वैद्यकिय/८८८/२०२०-२१ दि.३०/०६/२०२० रोजीचे आदेश.
६. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका दि.१०/०७/२०२० रोजीचे आदेश.
७. मिरा भाईंदर महानगरपालिका जा.क्र.मनपा/वै.आ/०२/२०२०-२१ दि.१८/०७/२०२० रोजीचा आदेश.
८. महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-2020/C.R.92/DMU-I दि.२९ जूलै २०२० चे आदेश

ज्याअर्थी, आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी कोविड-१९ विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी दि.३१/०७/२०२० रोजी संध्या ५.०० वाजेपर्यंत उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. ७ अन्वये हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये लॉकडाऊन जाहिर केला होता. आणि

ज्याअर्थी हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये लॉकडाऊन वाढविण्याची आवश्यकता आहे, असे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या सर्व संबंधित तरतुदीसह प्राप्त अधिकारांचा वापर करून आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे सोबत परिशिष्ठ मध्ये नमूद केलेल्या हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये दि.३१/०८/२०२० रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत लॉकडाऊन सुरू राहिल असे जाहिर करीत आहे.

हॉटस्पॉट क्षेत्राव्यतिरिक्त संपूर्ण शहरामध्ये राज्य शासनाने दि.२९ जुलै २०२० रोजी उपरोक्त संदर्भ क्र. ८ च्या आदेशान्वये जाहिर केल्याप्रमाणे Mission Begin Again सुरू राहिल. यामध्ये प्रामुख्याने मॉल्स, मार्केट, कॉम्प्लेक्स, जीम व स्विमिंग पूल वगळता सर्व भाजी मार्केटसह बाजारपेठ आणि दुकाने P-१ व P-२ तत्वावर चालविण्यास परवानगी असेल. (रस्त्याच्या एका बाजूला दुकाने, लेन, पॅसेज इत्यादी समताराखांना उघडले जावेत. तर दुसऱ्या बाजूची दुकाने विषम तारखेला उघडली जावीत.) सदरची दुकाने सकाळी ९.०० ते संध्याकाळी ७.०० या वेळेत उघडी राहतील. हे संबंधित प्रभाग क्षेत्र अधिकारी ठरवतील.

हॉटस्पॉट क्षेत्रामध्ये यापूर्वी वेळोवेळी जाहिर केल्याप्रमाणे सर्व निर्बंध लागू राहतील.

**(डॉ.विजय राठोड भा.प्र.से)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव
२) मा.पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव
३) मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी
४) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
५) मा.जिल्हाधिकारी, जि.ठाणे
६) पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण)
७) मा.महापौर/मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/मा.सभागृह नेता/मा.विरोधी पक्षनेता/सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
८) स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी
९) उपायुक्त (मुख्यालय) सर्व उपायुक्त,समन्वय अधिकारी-नागरी सुविधा केंद्र,
१०) सर्व सहा.आयुक्त/सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी
११) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी